मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » सोमवार, दि. 24 जून 2024 | पान- 1


# पिंपरीत 'अभी नहीं तो कभी नहीं' ची लढाई!


## विधानसभा निवडणूक बहुरंगी होणार : पिंपरीला हवा 'कॉर्पोरेट- प्रोफेशनल- उच्चशिक्षित- नवीन' चेहरा...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या पिंपरी विधानसभा मतदार संघामध्ये इच्छुकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मतदार संघाची पुर्नरचना झाल्यास, पिंपरी सर्वसाधारण होईल. त्यामुळे आरक्षीत जागेकरिता उमेदवारी मिळवता येणार नाही. त्यामुळे सर्वपक्षीय इच्छुकांनी उमेदवारीसाठी देव पाण्यात ठेवले असून, 'अभी नहीं तो कभी नहीं' अशा निर्धाराने कामाला सुरूवात केली आहे.

विशेष म्हणजे, महायुती, महाविकास आघाडी, एमआयएम आणि अन्य पक्षाच्या इच्छुकांनी पक्षश्रेष्ठींकडे 'फिल्डिंग' लावली असून, ही निवडणूक तीरंगी- चौरंगी नव्हे, तर बहुरंगी होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

भारतामध्ये निवडणुकांच्या राजकारणाचा इतिहास सुमारे १ शतकाचा आहे. निवडणुका, राजकीय पक्ष, मतदार संघ, विधिमंडळ या लोकशाही घटकांची पायाभरणी ब्रिटीश राजवटीतच झाली. निवडणुकांचा कणा म्हणजे निवडणूक आयोग आहे. भारतात सध्या २८ घटकराज्ये ७ केंद्र शासित प्रदेश आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार, २०२६ पर्यंत मतदार संघाची संख्या कामय राहील, अशी तरतूद संसदेत करण्यात आली होती. भारतीय संसदेने दर २० वर्षांनी मतदार संघांची पुनर्रचना करण्याची तरतूद केली आहे.



### सर्वपक्षीयांकडे उमेदवारीसाठी रस्सीखेच...

» महाविकास आघाडीकडून पिंपरी मतदार संघामध्ये शरद पवार गटाच्या उमेदवार सुलक्षणा धर, शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, महायुतीकडून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे, भाजपाचे निवडणूक प्रमुख अमित गोरखे, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांत सोनकांबळे इच्छुक आहेत. तसेच, एमआयएमकडून शहराध्यक्ष धम्मराज साळवे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज सूजात आंबेडकर किंवा शरद पवार गटाकडून प्रसिद्ध गायक आनंद शिंदे अशी एखादा सेलिब्रेटी उमेदवारही अचानकपणे पुढे येवू शकतो. सर्व पक्षीय नेत्यांकडे तिकीटासाठी इच्छुकांकडून रस्सीखेच असून, संधी मिळाली नाही, तर अपक्ष मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली आहे.

### पिंपरीला हवा 'कॉर्पोरेट- प्रोफेशनल- उच्चशिक्षित- नवीन' चेहरा...

» पिंपरी विधानसभा मतदार संघामध्ये २५ ते ३० टक्के मतदार अनुसूचित जाती-जमाती आणि अल्पसंख्याक घटकांतील आहे. मात्र, मतदार संघाचा भौगोलिक विचार करता मतदार संघाची विभागणी दलित वस्ती, झोपडपट्टी भाग, मध्यमवर्गीयांचा गावठाण तसेच बैठ्या घरांचा भाग, त्याचप्रमाणे उच्चवर्गीय मतदारांचा प्राधिकरण, टोलेजंग गृहप्रकल्प अशी होते. मात्र, २००९ पासून या मतदार संघातील विधानसभा सदस्यांनी विकासकामे आणि संपर्काबाबत दलित वस्ती, झोपडपट्टी भागालाच प्राधान्य दिल्याचे दिसते. मात्र, मतदार संघातील मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय मतदारांना आता प्रतिनिधी म्हणून ''कॉर्पोरेट- प्रोफेशनल- उच्चशिक्षीत- नवीन' चेहरा...'हवा आहे. जो आधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या कार्यशैलीचा मेळ घालून मतदार संघाचा परिपूर्ण सर्वसमावेशक विकास करेल. अशा मूल्यांवर खरा उतरणारा चेहरा म्हणून भाजपाचे अमित गोरखे आणि शरद पवार गटाच्या डॉ. सुलक्षणा धर- शिलवंत यांचे नावे प्राधान्याने पुढे येतात.

# पवन मावळात भेकराची शिकार; चौघांना अटक

## वन्य प्राण्याची शिकार करून मांस शिजवणाऱ्या चौघांना वन विभागाने रंगेहाथ पकडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवन मावळात भेकर जातीच्या वन्य प्राण्याची शिकार करून मांस शिजवणाऱ्या चौघांना वन विभागाने रंगेहाथ पकडले. बुधवारी (दि.१९) मळवंडी ठुले (ता. मावळ) येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपींना वडगाव मावळ न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना ६ जुलैपर्यंत वन कोठडी दिली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी हनुमंत जाधव यांनी ही माहिती दिली.

दिनेश ज्ञानेश्वर ठुले (वय ३५), गंगाराम धोंडिबा आखाडे (वय ३६) व सुनील ठोकू कोकरे (वय ३६, तिघेही रा.मळवंडी ठुले, ता. मावळ) व सुमित तुकाराम गुरव (वय १७, रा. वाळीन, ता. मुळशी) अशी शिकार करून मांस शिजवल्याच्या गुन्ह्यातील आरोपींची नावे आहेत. तर संशयित मुख्य आरोपी सचिन अशोक तोंडे (रा. मळवंडी ठुले, ता. मावळ) हा फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.



वनपरिक्षेत्र अधिकारी हनुमंत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, मळवंडी ठुले (ता. मावळ) गावच्या हद्दीत तीन ते चारजण वन्यप्राण्याची शिकार करून त्याचे मांस खाण्यासाठी शिजवत असल्याची गुप्त बातमी वनविभागाला मिळाली होती. त्यानुसार त्याठिकाणी छापा टाकला असता नमूद आरोपी हे भेकर जातीच्या वन्यप्राण्याचे मांस शिजवताना आढळून आले. आरोपींकडून भेकर प्रजातींचा वन्य प्राण्याचे , शिजवलेले मांस, मानवी बनावटीच्या २ बंदुका, कोयता, भाला, काडतूस, छरा, गॅस सिलेंडर आणि शेगडी इत्यादी ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास वनविभागाचे पथक करत आहे.

पुणे विभागाचे मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, उपवनरक्षक महादेव मोहिते, सहायक वनरक्षक अशितोष शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी वडगाव मावळ हनुमान जाधव, वन परिमंडळ अधिकारी दया डोमे, आशा मुंडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.




# पुणेकरांचा संताप! पब पहाटेपर्यंत सुरु कसे?

## फर्ग्युसन रस्त्यावरील तुकाराम पादुका चौकाजवळ असलेल्या एल 3 हा पब रविवारी पहाटे पाचपर्यंत सुरु होता

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पुणे पोलीस, उत्पादन शुल्क विभाग आणि महापालिकेने कल्याणीनगरसह शहरातील विविध भागांत असलेल्या पबवर कारवाई केली जात आहे. असे असतानाही फर्ग्युसन रस्त्यावरील तुकाराम पादुका चौकाजवळ असलेल्या एल ३ हा पब रविवारी पहाटे पाचपर्यंत सुरू होता.

फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील लिक्वीड लीजर लाउंज हा पब, बार पहाटे उशीरपर्यंत सुरू असल्याचे तसेच तेथे अमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिस प्रशासन जागे झाले.पोलिसांनी याप्रकरणी पब, बार चालक, मालकासह पाच जणांना ताब्यात घेतले, त्यांना अटक करण्याची कारवाई रात्री उशीरपर्यंत सुरू होती. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात संबंधित पब, बार सील केला.



> लिक्वीड लीजर लाउंजवरील कारवाईत आत्तापर्यंत पाच जणांना ताब्यात घेतले आहे, अटकेची प्रक्रिया सुरू आहे. त्यांच्याविरुद्ध गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे
> - चंद्रशेखर सावंत, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे.

कल्याणीनगर येथील अपघात प्रकरणानंतर पुणे पोलीस, उत्पादन शुल्क विभाग आणि महापालिकेने कल्याणीनगरसह शहरातील विविध भागातील पबवर कारवाई सुरू केली होती. त्यानंतरही फर्ग्युसन रस्त्यावरील तुकाराम पादुका चौकाजवळ असलेल्या लिक्वीड लीजर लाउंज (एल ३) हा पब, बार रविवारी पहाटे पाचपर्यंत सुरू होता. तेथे तरुण-तरुणी मद्यपान करत होते.

तसेच या पबमध्ये सुरू असलेल्या पार्टीच्यावेळी काही तरुण स्वच्छतागृहात अमली पदार्थांचे सेवन करत असल्याचा व्हिडिओ रविवारी सकाळी व्हायरल झाला होता. फर्ग्युसन महाविद्यालय सारख्या गजबजलेल्या ठिकाणी हा प्रकार सुरू असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला होता. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

### निलंबनही करण्यात आले

» संतोष कामठे, रवी माहेश्वरी, मानस मलिक, योगेंद्र गिराफे, उत्कर्ष देशमाने अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या चालक, मालक, व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांचे नाव आहे. याप्रकरणी पब, बार व्यावसायिकावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार (कलम १८८) गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्याची प्रक्रिया रविवारी रात्री उशीरपर्यंत सुरू होती.

> फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील एल ३ नावाचा पब शनिवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होता. दोन मालकांनी हा पब तिघांना चालविण्यास दिला होता. शनिवारी रात्री १.३० वाजल्यानंतर ही पार्टी सुरू होती. तेथे अमली पदार्थ होता की नाही, याची चौकशी केली जात आहे. बार सिल करण्यात आला आहे. काही जणांना ताब्यात घेतले आहे, तर दोन पोलिसांचे निलंबन केले आहे.
> - संदीप सिंग गिल, पोलिस उपायुक्त, परिमंडळ एक.

दरम्यान, परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त संदीप सिंग गिल यांनी या प्रकरणाची चौकशी केली. त्यावेळी हा सर्व प्रकार घडल्याचे उघडकीस आले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संतोष कामठे, रवी माहेश्वरी, मानस मलिक, योगेंद्र गिराफे, उत्कर्ष देशमाने या मालक, चालक, व्यवस्थापक, कर्मचारी यांना ताब्यात घेतले. तसेच पोलिसांकडून संबंधित पब, बार ही तत्काळ सील करण्यात आला. तर व्हायरल व्हिडिओमध्ये दिसत असलेला पदार्थ हा अमली पदार्थ आहे का, याचीही पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. दरम्यान, या गंभीर घटनेनंतर रात्र गस्तीवर असलेल्या दोन बीट मार्शलचे निलंबन करण्यात आले आहे.

# 'रिक्षावाले काकां'नो स्कूल वाहन सुरक्षित आहे ना?

## आरटीओकडून त्याची फिटनेस तपासणी, त्याचे योग्यता प्रमाणपत्र घ्यावे लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

'रिक्षावाले काकां'नो तुम्ही ज्या वाहनांमधून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करीत आहात, ते वाहन खरचं सुरक्षित आहे ना? आरटीओकडून त्याची फिटनेस तपासणी, त्याचे योग्यता प्रमाणपत्र घेतले का? नसेल तर थांबा. धोकादायक वाहने रस्त्यावर आणू नका. तत्काळ आपल्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करून घ्या, असे आवाहन पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

शहरात आरटीओकडे नोंद असलेल्या स्कूल व्हॅन व बसची संख्या जवळपास सहा हजार ८९५ इतकी आहे. या सर्व स्कूल व्हॅन व बसमधून दिवसाला साधारण चार लाखांच्या पुढे विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. प्रत्येक वर्षी स्कूल




> योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करताना ज्या दिवशी योग्यता प्रमाणपत्र संपलेले आहे. त्यादिवसापासून प्रतिदिन ५० रुपये अतिरिक्त फी दंडात्मक स्वरूपात घेण्याची तरतूद २०१६च्या केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार करण्यात आली आहे. त्या निर्णयाला माननीय उच्च न्यायालयामध्ये स्थगिती आदेश होते. ते आदेश माननीय उच्च न्यायालयाने उठवले आहेत. त्यामुळे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करताना उशीर झालेल्या प्रत्येक दिवसासाठी अतिरिक्त फी प्रतिदिन रुपये ५० लागू करण्यात आली आहे.
> - संजीव भोर, प्रादेशिक परिवहन अधिकारी, (प्रभारी) पुणे

व्हॅनला स्कूल बस नियमावलीनुसार योग्यता प्रमाणपत्राचे नुतणीकरण करून घ्यावे लागते. नुतणीकरण करून न घेणाऱ्या स्कूल बस व्हॅनवर आरटीओकडून कारवाई केली जाते.

### व्हॅनचे योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे आवश्यक

» नवीन शैक्षणिक वर्षे 15 जूनपासून सुरू झाले. त्यामुळे शहरासह जिल्ह्यात सर्वच रस्त्यावर स्कूल बसमधून विद्यार्थ्यांची वाहतूक केली जात आहे. या शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक होण्याच्या दृष्टीने संबधित बस, व्हॅनचे योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे आवश्यक आहे. तरी सर्व शाळा, महाविद्यालय व्यवस्थापन तसेच खासगी स्कूल बस मालकांनी तत्काळ आपल्या वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र तातडीने नुतनीकरण करून घ्यावे, यासाठी पुणे आरटीओकडून विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

शालेय बस किंवा व्हॅन या वाहनांना योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तपासणीसाठी अपॉइंटमेंट घेण्याची आवश्यकता नाही. या वाहनांनी शुल्क भरणा करून दिवे किंवा आळंदी रस्ता कार्यालययात तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र घेऊ शकतात. तसेच रविवारी (दि. 23) सुट्टीच्या दिवशीही नुतनीकरणाचे काम सुरू आहे. त्याबाबत कोणतीही अडचण असल्यास उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, संगम ब्रिज याठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे. योग्यता प्रमाणपत्रास उशीर झाल्यास वाहन चालकांना दिवसाला पन्नास रुपयांचा दंड आकारला जात आहे.

# मावळात बिबट्याची पुन्हा दहशत

## चाकण आणि कामशेत येथील ओम नर्सरी येथे बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

टाकवे बुद्रुक, ता.२३ : मावळ तालुक्यातील नाणोली तर्फे चाकण आणि कामशेत येथील ओम नर्सरी येथे बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अहिरवडे गावात बकरीचे करडू (पिल्लू) मृतावस्थेत आढळून आले असून परिसरातील कुत्र्यांचीही संख्या कमी झाली आहे. त्यामुळे, परिसरात बिबट्याचा वावर असावा, असा अंदाज स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. रात्रीच्यावेळी ग्रामस्थांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात येत आहे.

गेल्या तीन दिवसांत नाणोली तर्फे चाकण येथील उसाच्या शेतीत एक बिबट्या, ओम नर्सरी येथे मादी बिबट्या व तिचे पिल्लू दिसले. अहिरवडे गावात बकरीचे पिल्लू मृतावस्थेत आढळले. तसेच येथील कुत्र्यांचीही संख्या कमी झाल्याने परिसरात बिबट्याचे वास्तव्य असावे, असा अंदाज येथील नागरिकांनी लावला आहे. जंगलातील वन्यजीवांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याने वनक्षेत्रातील बिबटे मानव वस्तीकडे फिरू लागले आहेत, असे प्राणीमित्रांकडून सांगण्यात येत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मावळ तालुक्यात चोरट्या शिकाऱ्यांचे प्रमाण वाढत आहेत. शिकाऱ्यांना पकडण्यात वन विभाग अपयशी होत होते. चोरटे शिकारी आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे एकमेकांशी लागेबांधे तर नाही ना, असा संशय व्यक्त होत होता. अनेक वर्षानंतर प्रथम १९ जून रोजी मळवंडी ठुले येथे चार शिकाऱ्यांना भेकर जातीच्या प्राण्याचे मांस शिजवताना पकडल्याने प्राणी मित्रांनी वन विभागाचे कौतुक केले आहे.



### ...तर वन्यप्राण्यांचे अस्तित्व संपणार

» निसर्ग संपन्नतेने नटलेल्या मावळ तालुक्यात भेकर, सांबर, उदमांजर, खवले मांजर, रानससे, सायाळ, कोल्हा, रानडुक्कर, खोकड, लांडगे, मोर, लांडोर यांचे प्रमाण मोठे होते. मात्र, या पशू-पक्ष्यांचा कमी होत चाललेला अधिवास, चोरट्या शिकारी, सिमेंट कॉंक्रीटची वाढती जंगले, अवैध पद्धतीने होणारे उत्खनने, जंगलाची कत्तल, विविध प्रकल्पांसाठी होणारे भूसंपादन, त्यावर उभे राहणारे प्रकल्प, वन्यप्राण्यांची तस्करी यामुळे निसर्गाची वाताहत सुरू आहे. त्याचावेळीच बंदोबस्त न होत नसल्याने जंगलातील पशू-पक्ष्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

> कोणताही प्राणी हल्ला केल्याशिवाय प्रतिहल्ला करत नाही. वन्यप्राण्यांचे हक्क मानवाने हिरावून घेत जंगलतोड केली. तेथे कॉंक्रिटची घरे झाली. त्यामुळे, बिबट्याचे भक्ष्य नाहीसे होत आहे. त्यामुळे बिबट्या मानवी वस्तीमध्ये येत आहे. त्यासाठी मानवाने निसर्गाचे संवर्धन करून वन्य प्राण्यांनाही त्यांची हक्काची जागा दिली पाहिजे.
>
> \- संतोष दहिभाते, प्राणीमित्र

### बिबट्यांची मानव वस्तीत शिरण्याची कारणे

- वाढती सिमेंट कॉंक्रीटची जंगले
- भरमसाट वृक्षतोडीने जंगलांचा ऱ्हास
- बिबट्याचे भक्ष्य असलेल्या वन्यजीवांच्या चोरटी शिकार
- कडक उन्हाळ्याने पाण्यासाठी भटकंती
- उसाच्या शेतीमुळे लपण्यास जागा
- कुत्र्यांच्या अधिक संख्येमुळे मानव वस्तीसभोवती वावर

> आपल्या जिवास धोका असल्याचे जाणवल्यावर वन्यप्राणी हल्ला करतात. बिबट्या आपल्यापेक्षा जास्त उंचीच्या प्राण्यांवर हल्ला करत नाही. परंतु, रात्रीच्यावेळी बाहेर पडताना नागरिकांनी काळजी घ्यावी. एकटे फिरणे टाळावे. बिबट्या दिसल्यास आरडा-ओरडा करा म्हणजे तो पळून जाईल. त्यांना त्रास न देणे हेच त्यांच्या आणि मानवाच्याही हिताचे आहे.
>
> \- सुशील मंतावर, वन परिक्षेत्र अधिकारी

# श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यांमुळे वाहतुकीत बदल

## भाविकांना कोणताही अडथळा निर्माण होवू नये, तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत बदल केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आषाढी वारीसाठी शुक्रवारी (ता. २८) देहूतून प्रस्थान झाल्यानंतर हा सोहळा शनिवारी (ता. २९) आकुर्डी येथे मुक्कामी आहे. रविवारी (ता. ३०) पहाटे पालखी पिंपरी-चिंचवड शहरातून पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. यावेळी भाविकांना कोणताही अडथळा निर्माण होवू नये, तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहरातील वाहतुकीत शनिवार (ता. २९) व रविवारी (ता. ३०) बदल करण्यात आला आहे. तसेच प्रस्थान सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी देहू, आळंदी येथे पार्किंगचीही व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

**भोसरीतील बदल**

रविवारी (ता. ३०) पहाटे चार ते रात्री दहा पर्यंत पुणे-नाशिक महामार्गावरून सर्व प्रकारच्या वाहनांना भारतमाता चौक, मोशीगांव चौक पांजरपोळ चौक भोसरी- आळंदी रोड, भोसरी-दिघी रोड, तसेच नाशिकफाटा जुना पुणे-मुंबई रस्ता याठिकाणावरुन आळंदी, दिघी तसेच पुणे शहारात जाण्यास प्रवेश बंदी असेल मोशीवरुन शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी पांजरपोळ चौक येथून उजवीकडे वळून स्पाईनरोड टेल्को कंपनीच्या पाठीमागील बाजूने केएसबी चौकातून उजवीकडे वळून सरळ थरमॅक्स चौकातून डावीकडे वळून खंडोबामाळमार्गे चिंचवडगाव येथून उजवीकडे वळून डांगेचौक येथून डावीकडे वळून औंध मार्गे शिवाजीनगर व इच्छित स्थळी जातील.भोसरीवरुन शिवाजीनगर जाणाऱ्या वाहनचालकांनी बाबर पेट्रोल पंप येथून उजवीकडे वळून टेल्कोरोडने केएसबी चौकमार्गेवरीलप्रमाणे जातील. यासह नाशिकफाटा उडाणपुलावरून सरळ कोकणे चौक व जगताप डेअरी चौकातून वाहनांना इच्छितस्थळी जात येईल.हा बदल रविवारी (ता. ३०) पहाटे चार ते रात्री दहापर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होईपर्यंत लागू राहणार आहे.



### चिंचवडमधील बदल

» बिजलीनगर ते भक्तीशक्ती चौक हा मार्ग वाहतुकीसाठी बंद राहणार असून, ही वाहने ही बिजलीनगर चौक येथून डावीकडे वळून डी. वाय. पाटील कॉलेजसमोरील मार्गाने रावेतमार्गे मुंबईकडे अथवा डांगे चौक थेरगावकडे जातील. चिंचवडगाव व क्रांतिवीर चापेकर चौक ते महावीर चौकापर्यंतची वाहतूक बंद राहणार असून, ही वाहने चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेतमार्गे इच्छितस्थळी जातील तसेच भोसरीकडे जाणारी वाहने ही बिजलीनगर चौक, छत्रपती संभाजी चौक, भेळ चौक काचघर चौक भक्ती शक्ती चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. चिंचवडेनगर टी जंक्शन ते महावीर चौक पर्यंतची वाहतूक बंद राहणार आहे. महावीर चौक चिंचवड येथून पालखी मार्गस्थ होत असताना महावीर चौकाकडे येणारी वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे. हा बदल शनिवारी (ता. २९) सायंकाळी चार ते रविवारी (ता. ३०) दुपारी बारापर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होईपर्यंत लागू राहणार आहे

### पिंपरीतील बदल

» महावीर चौक ते डी मार्ट सेवा रस्ता बंद राहणार असून, ही वाहने ग्रेडसेपरेटरमधून वळविण्यात येणार आहेत. ऑटो क्लस्टर ते हनुमान मंदिर चौक या मार्गावरील वाहने सेंट मदर तेरेसा पुलावरून काळेवाडी मार्गे जातील. पिंपरी पूल ते सम्राट चौक वाहतुकीसाठी बंद राहणार असून, या मार्गावरील वाहने महावीर चौक मार्गे जातील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात येणारे रस्ते वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत. केएसबी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच ऑटो क्लस्टर या मार्गावरील वाहने केएसबी चौकाकडून भोसरी मार्गे जातील. हा बदल रविवारी (ता. ३०) पहाटेपासून रात्री नऊपर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होई पर्यंत लागू राहणार आहे.

# आळंदीत मंगळवारपासून वाहनांना नो एन्ट्री

## प्रस्थान सोहळ्यानिमित्त 30 जूनपर्यंत वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली


**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळ्याचे 29 जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. प्रस्थानानंतर पहिला मुक्काम आळंदी येथेच असून 30 जून रोजी पालखी सोहळा पुणे मुक्कामाकडे मार्गस्थ होणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी भाविक तीर्थक्षेत्र आळंदी येथे दाखल होतात. त्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस वाहतूक विभागाकडून अत्यावश्यक आणि दिंडीची वाहने वगळून इतर वाहनांसाठी मंगळवारी (दि. 25) दुपारी 12 पासून ते रविवार (दि. 30) रात्री 9 वाजेपर्यंत आळंदी परिसरातील वाहतूक वळवण्यात आली आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिली.

वाहनचालकांना पर्यायी मार्ग म्हणून चाकण – शिक्रापूर महामार्गे चाकण, वडगाव घेनंद, कोयाळी, मरकळ तसेच पुणे – नगर महामार्गे लोणीकंद फाटा, तुळापूर, मरकळ, आळंदी व चऱ्होली बुद्रुक फाटा ते चऱ्होली खुर्द अशा जोडरस्त्यांचा वापर करता येणार आहे. दरम्यान, सोहळ्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज होत असून, सोहळ्यासाठी प्रत्येक मुख्य चौकात दक्षता कक्ष उभारण्यात आला आहे. प्रमुख मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही बसविण्यात येत असून परिसराच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्यात येणार आहे.

श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी शुक्रवारी (ता. २८) देहूतून, तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी शनिवारी (ता. २९) आळंदीतून आषाढी वारीसाठी प्रस्थान ठेवणार आहे. तुकोबारायांच्या पालखीचा पहिला मुक्काम देहूतील इनामदार वाडा येथे असून, शनिवारी (ता. २९) हा सोहळा आकुर्डीतील विठ्ठल मंदिर येथे मुक्कामासाठी येणार आहे.

तसेच माउलींच्या पालखीचा पहिला मुक्काम आळंदीतीलच गांधी वाडा येथे असेल. त्यानंतर या दोन्ही पालख्या शनिवारी (ता. ३०) पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ राहणार आहे. दरम्यान, भाविकांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, हा सोहळा निर्विघ्न पार पडावा, यासाठी आळंदी, देहू, मोशी परिसरात वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.



### दिघी-आळंदी वाहतूक विभागातील बदल

- बंद मार्ग – चिंबळी फाटा चौक, चाकण येथून आळंदीकडे येणारी वाहने आणि आळंदी फाटा-चाकण येथून आळंदीकडे येणारी वाहने
- पर्यायी मार्ग – जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे तसेच भोसरी चौकातून मॅगझीन चौक मार्गे जाता येईल.
- बंद मार्ग – चाकण-वडगाव घेनंद शेलपिंपळगाव मार्गे आळंदीकडे येणारी वाहने
- पर्यायी मार्ग – कोयाळी कमान, कोयाळी मरकळगाव मार्गे जातील.
- बंद मार्ग – मरकळकडून धानोरे फाटा मार्गे आळंदीकडे येणारी वाहने
- पर्यायी मार्ग – धानोरे फाटा – च-होली फाटा – मॅगझीन चौक / अलंकापुरम चौक मार्गे जातील.
- बंद मार्ग – भारतमाता चौक, मोशी, मोशी चौक येथून आळंदीकडे येणारी वाहने
- पर्यायी मार्ग – जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे, भोसरी चौकातून मॅगझीन चौक, मोशी-चाकण-शिक्रापूर मार्गे जातील.
- बंद मार्ग – पुणे-दिघी मॅगझीन चौकाकडून आळंदीकडे येणारी वाहने
- पर्यायी मार्ग – भोसरी-मोशी-चाकण, च-होली फाटा-कोयाळी, शेलपिंपळगाव आणि अलंकापुरम-जय गणेश साम्राज्य चौक मार्गे जातील.

### सर्वप्रकारच्या वाहनांसाठी बंद असणारे मार्ग

- पुण्याकडून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना चऱ्होली फाटा चौकाच्या पुढे जाण्यास बंद.
- मोशीकडून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना डुडुळगाव जकात नाक्याच्या पुढे जाण्यास बंद.
- चिंबळीकडून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना केळगाव चौक/बापदेव चौकाचे पुढे जाण्यास बंद.
- चाकणकडून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना इंद्रायणी हॉस्पीटलचे पुढे जाण्यास बंद.
- वडगाव घेणंदकदून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना विश्रांतवडचे पुढे जाण्यास बंद.
- मरकळकडून आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना धानोरी फाटा/पीसीएस चौकाच्यापुढे जाण्यास बंद.

# संजय गांधी योजनेचे 7 हजार लाभार्थी अनुदानापासून वंचित

## घोडेगाव येथील तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उदासिनीतेचा परिणाम

**पुणे | प्रतिनिधी**

एक कोटी सत्तर लाख रुपये निधी आंबेगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांसाठी एप्रिल आणि मे महिन्यासाठी उपलब्ध झाला. परंतु घोडेगाव येथील तहसील कार्यालयात असलेल्या संजय गांधी योजनेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उदासिनीतेमुळे ७ हजार लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

आंबेगाव तालुका तहसील कार्यालय घोडेगाव येथील संजय गांधी विभागातील महसूल सहाय्यक यांच्या घोडचुकीमुळे आंबेगाव तालुक्यातील लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अनुदान वर्ग करण्यात आलेले नाही, असे समर्थ दिव्यांग सेवा संस्था आंबेगाव तालुक्याचे अध्यक्ष समीर टावरे सागितले. त्यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद करून म्हटले आहे की, आंबेगाव तालुक्याचे तहसीलदार संजय नागटिळक यांच्याशी संजय गांधी, श्रावण बाळ आणि इंदिरा गांधी योजनेची पेन्शन अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही. याविषयी दिव्यांग बांधवांनी विचारणा केली, असता अनुदान प्राप्त झाले आहे.

दोन दिवसात वर्ग होतील. अशी उडवा उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोप दिव्याग बांधव सुनील दरेकर आणि ज्ञानेश्वर शिंदे यांनी केला आहे. महसूल सहाय्यक हे वेळोवेळी संबंधित लाभार्थ्यांच्या संजय गांधी योजनेच्या फॉर्मची कागदपत्रे तसेच संजय गांधी अनुदान याद्या तयार करत असताना त्यामध्ये वारंवार चुका करतात, याविषयी संबंधित विभागाला याविषयी माहिती आहे. तरी त्याला पाठीशी घालण्याचे काम ते करत आहेत. संबंधित अधिकाऱ्याची ताबडतोब बदली करावी. त्याच्या त्रास विनाकारण संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना इत्यादी योजनेतील लाभार्थ्यांना होत आहे.




> “ महसूल सहाय्यकच्या चुकीमुळे लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले आहे. याबाबत संबंधिताला तहसीलदार संजय नागटिळक आणि मी समज दिलेली आहे. तसेच त्याचा या महिन्याचा पगार थांबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे. संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना जो त्रास झाला. त्याबद्दल आम्ही दिलगीर असून यापुढे अशा पद्धतीने कोणालाही त्रास होणार नाही. याची काळजी घेऊ.
>
> - दामूराजे असवले, नायब तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, घोडेगाव.

> “ घोडेगाव तहसील कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर असलेला संजय गांधी विभाग दिव्यांग बांधवांसाठी तळमजल्यावर घेण्यासंदर्भामध्येही तहसीलदार यांच्याशी भेटून पत्र व्यवहार केला गेला असतानाही गेल्या आठ ते नऊ महिन्यापासून हा विभाग तळ मजल्यावर आलेला नाही. संबंधित कामचुकार महसूल सहाय्यक यांच्यावर कारवाई करावी, तसेच संजय गांधी विभाग तळमजल्यावर न घेतल्यास तहसील कार्यालय घोडेगाव येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.
>
> - सुनील दरेकर आणि ज्ञानेश्वर शिंदे, दिव्यांग बांधव, आंबेगाव तालुका.